# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २२/१०/२०१८ रोजी (का.प.क्र.१२) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक २२/१०/२०१८ रोजी (शुक्रवार दि.१९/१०/२०१८ रोजीची तहकूब सभा, का.प.क्र.१२) मा.सभापती श्री.रेणुकादास(राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:३० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त,श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०४. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०५. स.स.श्री.सय्यद मतीन रशीद
०६. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०७. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०८. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०९. स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
१०. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
११. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
१२. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
१३. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१४. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्रीमती.सायरा बानो : माझे जेट (भाया) यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांना सभागृहाच्यावतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

(जो श्रध्दांजलीचा प्रस्ताव मांडला त्यास श्री.गजानन बारवाल, श्रीमती.स्वाती नागरे, सत्यभामा शिंदे यांचे अनुमोदन आहे.)

मा.सभापती : त्यांना सभागृहातर्फे २ मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

(यावेळी स.सदस्य श्रीमती.सायरा बानो यांचे जेट (भाया) यांचे दुःखद निधनाने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.गजानन बारवाल : पाणी पुरवठ्याचे काही नियोजन नाही. शहरातला हा मोठा प्रश्न आहे.

श्रीमती.स्वाती नागरे : पाण्याच्या एक्सप्रेस मेन लाईनवरुन सिडको एन-५ ला किती पाणी देतो? यातुन मरीमाताला किती पाणी मिळते? एन-७, नारेगाव, ब्रिजवाडी भागात किती पाणी मिळते आणि त्यात नळाची संख्या किती आहे?

श्री.रुपचंद वाघमारे :मागिल एक वर्षापासुन पाणी पुरवठ्याच्या फाईल मंजुर होत नाही.खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता(पा.पु) : तो वार्ड श्री.अशोक पदमे यांच्याकडे आहे. माहिती घेऊन सांगतो.

श्रीमती.शेख नसरीन : वार्ड क्र.५० मिल कॉर्नरमध्ये पाणी सप्लायचे अधिकारी काहीच काम करीत नाही.

मा.सभापती : श्री.कोल्हे मिल कॉर्नर भागात जे लाईनमन आहेत त्यांची बदली करण्यात यावी. आणि स.सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता(पा.पु) : श्रीमती.नागरे ताईच्या प्रश्ना बाबत आकडेवारी आहे पुर्ण माहिती घेऊन सांगतो.

मा.सभापती : याबाबतीत पाणी पुरवठा ज्या दिवशी असेल त्या दिवशी संबंधीत अधिकाऱ्यांना सुचना द्यावी, प्रत्यक्ष जाऊन पाहणी करावी. आणि श्री.रुपचंद वाघमारे यांच्या वार्डातील पाणी पुरवठ्याच्या फाईल एक वर्षापासुन होत नाही यामध्ये ज्या काही अडचणी असेल त्या तपासुन योग्य कार्यवाही करावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : नगरसेवकांना कल्पना न देता वार्डामधील नवीन रस्ते खोदुन नळ कनेक्शन दिले जाते.

मा.सभापती : ज्यावेळेस नळ कनेक्शनची फाईल समोर येते तेव्हा रस्ता खोदावा लागेल की नाही ते बघितले पाहिजे जर पैसे भरुन घेतो. मग पैसे भरुन घेत असतांना ते रस्ते तातडीने दुरुस्त का होत नाही? याची पुर्ण काळजी घेण्याची जबाबदारी पाणी पुरवठा विभागाची आहे.

कार्य.अभियंता(पा.पु) : रिटेलचे काम हे वार्ड इंजिनिअर मार्फत होते. आम्ही त्यांना कळवतो.

मा.सभापती : ९० टक्के रस्ता खोदायची वेळ यायला नाही पाहिजे. रस्ता होण्याआधी नळ कनेक्शन व्हायला पाहिजे. वार्ड इंजिनिअर बरोबर सर्व्हे केला पाहिजे आणि रस्ता खोदल्या नंतर तातडीने दुरुस्त करण्याकडे लक्ष दिले जावेत.

श्री.गजानन बारवाल : पाण्याच्या नियोजनासाठी तज्ञ लोकांची नेमणुक केली आहे. पैसा उपलब्ध आहे. काम का करु शकत नाही.

मा.सभापती : पाण्याची अडचण शहरामध्ये खुप मोठी आहे. समांतर लाईन कशी होईल हे बघत असतांना फक्त जायकवाडीवर निरभर न राहता शहरासाठी नैसर्गिक जल स्त्रौत आहेत त्याचा पण पाणी पुरवठ्यासाठी वापर करण्यासाठी प्लॅन करत आहोत. जायकवाडीवरुन पाणी जलशुध्दी केंद्रात पडते तेथुन पाणी १०० मीटर उंचीवरुन आणतो. आणि फक्त पाणी पुरवठ्यासाठी विद्युत पुरवठ्यावर होणारा खर्च ३५ कोटी रुपये आहे. पाण्याचे नियोजनासाठी हर्सुल, सावंगी आणि सातारा परिसरात दोन तळे आहेत. त्यामध्ये नैसर्गिक रितीने पाणी येत आहे. विद्युत वापर जास्त न वापरता शुध्द पाणी पुरवठा शहरामध्ये करता येतो. यामध्ये जे तज्ञ नियुक्त केले आहे ते २९ तारखेला त्याचा डी.पी.आर सुध्दा देणार आहे. २-३ महिन्याच्या प्रत्यक्ष कामे सुरु करण्याच्या दृष्टिकोनातुन प्रयत्न करावे.

श्रीमती.राखी देसरडा : मागच्या मिटींगमध्ये मायोवेल्स या कंपनीच्या निविदा मंजुर करतांना सर्व स्थायी समिती सदस्यांनी मागणी केली होती की, संबंधीत कंपनीने ज्या ज्या महानगरपालिकेत काम केले आहे तेथे प्रशासन व पदाधिकाऱ्याने जाऊन पहानी करावी व तसा अहवाल सर्वसाधारण व स्थायी समिती सभेत द्यावा असे प्रशासनाला आदेशित केले होते. तसा कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही.

मा.सभापती : सुचना केलेली आहे दरवर्षी अहवाल स्थायी समितीकडे येणार आहे. तात्काळ कार्यवाही होईल.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : व्यापारी संकुलनामध्ये महिला स्वच्छतागृह नाही. यांना भोगवटा प्रमाणपत्र कसे मिळाले. किती व्यापारी संकुलनामध्ये स्वच्छतागृह आहे आणि यांना परमिशन कशी दिली? भोगवटा प्रमाणपत्र देत असतांना पहाणी, तपासणी होत नाही का?

नगररचना विभाग : अशा जागेवर स्वच्दतागृह असणे आवश्यक आहे.

मा.सभापती : परवानगी देतांना स्वच्छतागृह दाखवलेले आहेत परंतु त्याचा वापर जर कमरशिअल युज म्हणुन होत असेल तर कार्यवाही झाली पाहिजे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : व्यापरी संकुलनामधील स्वच्छतागृह आहेत ते सगळ्यांसाठी खुले असावेत. त्या संदर्भात संबंधीतांना काही नोटीसा पाठवण्यात आलेले आहे का?

मा.सभापती : याची पुर्ण नोंद घेण्यात यावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : अमरप्रित ते दर्गा रोड पर्यंत एक सुध्दा पार्किंग नाही, तसेच कमर्शीयल इमारतीस स्वच्छतागृह नसतांना कम्प्लशिल कसे दिले जाते.

नगररचना विभाग : पार्किंगच्या बाबतीत सर्व्हे करत आहोत.

मा.सभापती : महत्वाचे जे रस्ते त्याची तपासणी करुन त्या भागातील नागरीकांना स्वच्छतागृह, पार्किंगच्या अडचणी आल्या नाही पाहिजे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : स्वच्छतागृहा बाबत मा.उच्च न्यायालयाने सुध्दा आदेश दिलेले आहे.

मा.सभापती : मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उलघन होणार नाही याकडे लक्ष द्यावे. स.सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे सर्व तपासणी करुन नियमानुसार कार्यवाही करावी.

श्रीमत.शिल्पाराणी वाडकर : तीन चार वेळेस आदेश देऊन सुध्दा फायर एनओसीचा अहवाल अजुनही प्राप्त झालेला नाही.

मा.सभापती : प्रशासनाने आठ दिवसामध्ये याचा अहवाल स.सदस्यांना देण्यात यावा.

श्री.ऋषिकेश खैरे : मागच्या बैठकीत मा.आयुक्त होते तेव्हा अतिक्रमण विभागाला माझ्या वार्डातले अतिक्रमण काढण्यात यावे. सुचना केल्या आता पर्यंत एकही अतिक्रमण पाडण्यात आलेले नाही.

मा.सभापती : सर्व नगरसेवकांच्या अतिक्रमणाच्या तक्रारी आहेत. एकही तक्रारींवर अद्याप कार्यवाही का झालेली नाही.

कार्य.अभियंता(अति) : अतिक्रमण विभाग हा नगर रचना विभागाशी सलग्न करण्यात आलेला आहे. स्टाफ दिलेला आहे तक्रारीची स्कुटनी करुन प्राधान्य क्रम ठरवुन कार्यवाही केली जाईल.

मा.सभापती : वृत्तपत्रामध्ये आले आहे की, शिवाजी नगर, देशमुख नगर भागात महानगरपालिकेची ३५ कोटी रु.ची जागेवर कुठलीही परवानगी नसतांना बांधकाम चालु आहे. कार्यवाही का होत नाही.

कार्य.अभियंता(अति) : दोन वेळा काढण्यात आलेले आहे. पोलिसांना पत्र सुध्दा देण्यात आले आहे. पोलीस पथक मिळाल्यावर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.ऋषिकेश खैरे : तिथे महानगरपालिकेचा बोर्ड लावण्यात यावा. ती मनपाची जागा आहे.

मा.सभापती : नगरसेवकांच्या अतिक्रमणाबाबत तक्रारी आहेत त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचा ॲक्शन प्लॅन तयार करुन सात दिवसाच्या आत सर्व तक्रारींचा निपटारा करण्यात यावा.

श्रीमती.सायरा बानो : वार्ड क्र.२३ शहागंजमध्ये कचऱ्याचे तीन शेड आहे. तिथे आठ वेळेस कचऱ्याला आग लागली होती. श्री.भोंबे यांना काही वेळेस फोन केल्यावर एक वेळेसच फोन उचलला. फायर ब्रिगेडला आम्हालाच बोलवावे लागते. शेड काढण्यासाठी पंधरा दिवसापासुन श्री.भोंबे यांना सांगत आहे. फायर गाडी सुध्दा वेळेवर येत नाही.

घनकचरा (कक्ष प्रमुख) : तिन शेड शहागंज, भाजी मंडीत बनवण्यात आले आहे. जेव्हा जेव्हा स.सदस्यांचा फोन आला तेव्हा तेव्हा फायरची गाडी पाठवण्यात आली आहे. काढण्यासाठी लेखी स्वरुपात पत्र दिलेले आहेत. परंतु बिल बाकी असल्यामुळे श्री.फारुख यांनी ते काढले नाही.

वार्ड अभियंता : तीन शेड काढण्याबाबत कार्यवाही चालु आहे. थर्डपार्टी इनस्पेक्शन झाले की शेड काढण्यात येईल.

मा.सभापती : जे काही पेमेंटचा प्रोब्लेम आहे तो तातडीने संपवण्यात यावा. पुढच्या बैठकीत हा विषय चर्चेला येऊ नये.

श्रीमती.स्वाती नागरे : माझ्या वार्डात ओला आणि सुखा कचरा व्यवस्थित वेगळा केला जातो. पण ते पिट पुर्ण भरले आहे. आणि ओपन स्पेसवर कोरडा कचरा पडलेला आहे. लवकरात लवकर तो कचरा उचलण्यात यावा.

मा.सभापती : दोन ते तीन दिवसात शहरातला पुर्ण कचरा उचलण्यात यावा.

श्री.ऋषिकेश खैरे : शहरामध्ये कुत्र्यांची संख्या खुप वाढली आहे. डॉग व्हॅन पाच वाजे नंतर बंद होते. रात्री सुध्दा डॉग व्हॅन चालु असायला पाहिजे.

मा.सभापती : रात्री दहा नंतर आणि सकाळी सातच्या आधी डॉग व्हॅन फिरली पाहिजे. शहरामध्ये फिरते पथक ठेवण्यात यावे.

श्री.रुपचंद वाघमारे : वार्डामध्ये बाहेरील देशातले भंतीजी आले होते. त्यांच्यासाठी एकतानगरमध्ये भोजनाचा कार्यक्रम ठेवला होता. त्या कार्यक्रमाच्यावेळी लोकांमधुन २० ते २५ मोकाट गायी पळत होत्या. त्या ठिकाणी नागरीकांची पुर्ण धावपळ झाली होती. मा.सभापती आणि मी स्वतः सुचना केल्यानंतर सुध्दा श्री.नाईकवाडे यांनी कारवाई केलेली नाही. आतापर्यंत तो गोठा तसाच आहे.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : ताबडतोब त्याच्यावर कार्यवाही करण्यात यावी आणि तो गोठ्यावाला मालक ऐकत नसेल तर त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. |
| श्रीमती.सत्यभामा शिंदे | : एपीआय कॉर्नर रोडवर झेब्रा क्रॉसिंग नाही. तो एक कोटी रु.चा आदर्श रस्ता करण्यात आलेला आहे. तो रस्ता अर्धवट आहे. |
| मा.सभापती | : सदर रस्त्याचे काम करण्यात यावे आणि झेब्रा क्रॉसिंग चे सुध्दा काम बघण्यात यावे. एपीआय कॉर्नरला खुप जास्त ट्रॅफिक आहेत तिथे सिंग्नलची व्यवस्था करण्यात यावी. |
| श्री.ऋषिकेश खैरे | : शहरातील किती मेन रस्त्यांवर झेब्रा क्रॉसिंग केलेले आहे? |
| मा.सभापती | : ज्या ठिकाणी आवश्यक आहेत तिथे झेब्रा क्रॉसिंग करण्यात यावे. |
| कार्यकारी अभियंता | : झेब्रा क्रॉसिंगसाठी ट्राफिक डिपार्टमेंट बरोबर बैठक झालेली आहे त्या अनुषंगाने वार्ड नुसार इंस्टीमेन्ट तयार करुन टेंडर प्रोसेसमध्ये आहे. पोलिस विभागाने जिथे जिथे सांगितले तिथे सर्व्हे केला आहे. आठ ते पंधरा दिवसामध्ये टेंडर होईल. |
| श्री.सय्यद मतीन | : नगररचना विभागामध्ये टीडीआरच्या चार लोकांच्या फाईल मिळत नाही. मा.आयुक्तांना सुध्दा याबाबत पत्र दिले आहे. |
| मा.सभापती | : कोणत्या प्रकरणाच्या संचिका मिळत नाही त्याची यादी नगररचना विभागात द्यावी ते बघुन सांगतील. |
| श्री.सय्यद मतीन | : एक कोटी रुपयाची फाईल होती टेंडर प्रोसेसला होती ती फाईल सुध्दा गहाळ झाली आहे. |
| तांत्रिक कक्ष प्रमुख | : झोन क्र.१ अंतर्गत जे कामे आहेत त्याबाबत माहिती मा.आयुक्ताकडे गेलेली आहे. माहिती घेऊन जे काही प्रश्न असतील ते निकाली काढण्यात येईल. |
| मा.सभापती | : ही फाईल लवकरात लवकर शोधा आणि यापुढे कुठलीही फाईल गहाळ होता कामा नये असे झाल्यास संबंधीत अधिकाऱ्यावर जबाबदारी राहील. |
| श्री.ऋषिकेश खैरे | : मागच्या बजेट नुसार कुठले विकाम कामे दहा लाखापर्यंतचे झाले आहे? त्याचा खुलासा करण्यात यावा. |
| वार्ड इंजिनिअर | : टेंडर प्रोसेसमध्ये काही फाईल आहेत त्यामुळे कामे झालेली नाहीत. |
| मा.सभापती | : विकाम कामाच्या ज्या संचिका कुठली फाईल कुठे आहेत त्याची यादी संध्याकाळ पर्यंत माझ्याकडे द्यावी. |
| श्री.ऋषिकेश खैरे | : जवळपास शहरातले सगळेच विकाम कामे पेंडिंग आहे. कारण कॉन्ट्रॅक्टरचे बिल देणे बाकी आहे. त्यामुळे कुठल्याही वार्डातले विकाम करण्यासाठी कॉन्ट्रॅक्टर तयार नाही. यामध्ये सर्व चुक प्रशासनाची आहे. समर्थ नगर भागामध्ये १०० टक्के कर वसुल होतो. माझ्या वार्डातला जो टॅक्स जमा होतो तो निधी माझ्या वार्डातच खर्च करण्यात यावा. |
| मा.सभापती | : प्रशासनाला सुचना देण्यात येते की, विकास कामाच्या संदर्भाने कुठलीही संचिका अतिरिक्त फिरवु नका. आणि आचारसहितेच्या अगोदर तातडीने कामे मार्गी लावण्याचे नियोजन प्रशासनाने करावे. |
| श्रीमत.राखी देसरडा | : माझा वार्ड सुध्दा १०० टक्के टॅक्स भरणारा वार्ड आहे. यामध्ये काही वेगळे करता येईल. |
| मा.सभापती | : सर्वसाधारण सभेमध्ये विषय पत्रिकेवर हा विषय ठेऊ आणि धोरण ठरवु. |

**<u>विषय क्र. १०६ :</u>**

दि.३१/०७/२०१८ (का.प.क्र.०५), दि.०७/०८/२०१८ (का.प.क्र.०६) व दि.२३/०८/२०१८ (का.प.क्र.०७) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

दि.३१/०७/२०१८ (का.प.क्र.०५), दि.०७/०८/२०१८ (का.प.क्र.०६) व दि.२३/०८/२०१८ (का.प.क्र.०७) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. १०७ :** (दि.०२/०७/२०१८ (का.प.क्र.०३) रोजीच्या सभेतील स्थगीत विषय क्र.१२ )

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका मालकीचे विविध ठिकाणी असलेल्या व्यापारी संकुलातील गाळे भाडेतत्वावर देणेसाठी कार्यालयीन जा.क्र./मनपा/मामअ/५३४/२०१७, दि.२१/०८/२०१७ अन्वये वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन निविदा मागविण्यात आल्या असता, सदर व्यापारी संकुलातील गाळ्यांसाठी खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या असून, ह्या मुख्य लेखाधिकारी, लेखाधिकारी व मालमत्ता अधिकारी यांचे समक्ष दि.२०/०९/२०१७ रोजी उघडण्यात आल्या, त्याचे दर खालीलप्रमाणे –

**पिया मार्केट (तळ मजला) व्यापारी संकुल**

| अ.क्र. | नाव | दुकान क्र. | प्रतीमाह आधारभुत किंमत | प्रतीमाह भरलेली निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री.सिध्दांत गोपाल शर्मा | २६ | २६३९/- | २८०१/- |
| ०२. | श्री.सोहन बाखरीया | २६ | २६३९/- | २७३८/- |
| ०३. | श्री.नितीन छोटुराम मेघावाले | २६ | २६३९/- | २६५०/- |

उपरोक्त सदर गाळे करीता वरीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या असून तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा रक्कम रू.२८०१/- प्रतिमाह असून निविदा श्री.सिध्दांत गोपाल शर्मा यांची आहे.

**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (सादिया मार्केट) व्यापारी संकुल**

| अ.क्र. | नाव | दुकान क्र. | प्रतीमाह आधारभुत किंमत | प्रतीमाह भरलेली निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | सौ.प्रज्ञा राहुल पवार | एस-१६ | २२७५/- | २४५०/- |
| ०२. | श्री.सचिन विजय पवार | एस-१६ | २२७५/- | २४००/- |
| ०३. | श्री.राहुल विजय पवार | एस-१६ | २२७५/- | २३५०/- |

उपरोक्त सदर गाळे करीता वरीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या असून तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा रक्कम रू.२४५०/- प्रतिमाह असून निविदा सौ.प्रज्ञा राहुल पवार यांची आहे.

करीता त्यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर, मान्यता झाल्यास संबंधीताकडून करारनामा करून घेवून कार्यादेश देण्यात येईल.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका मालकीचे पिया मार्केट (तळ मजला) येथे असलेल्या व्यापारी संकुलातील दुकान क्रमांक २६ भाडेतत्वावर देणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त दराचे निविदाधारक श्री.सिध्दांत गोपाल शर्मा यांच्या प्रतीमाह रक्कम रू.२८०१/- दराच्या निविदेस तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (सादिया मार्केट) व्यापारी संकुलातील दुकान क्रमांक एस-१६ भाडेतत्वावर देणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त दराचे निविदाधारक सौ.प्रज्ञा राहुल पवार यांच्या प्रतीमाह रक्कम रू.२४५०/- दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०८ :** (दि.०९/१०/२०१८ (का.प.क्र.११) रोजीच्या सभेतील स्थगीत विषय क्र.१०१)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात दररोज सरासरी ४५० मेट्रीक टन घनकचऱ्याची उत्पत्ती होते. दररोज उत्पत्ती होणाऱ्या घनकचऱ्याची वाहतुक करण्यासाठी महानगरपालिकेकडे स्वतःचे ०६ हुकलोडर्स, ०७ स्कीपलोडर्स, १५ टिप्पर्स ही वाहने आहेत. तसेच वाहनात घनकचरा भरण्यासाठी ०५ ट्रॅक्टर लोडर्स व ०६ जेसीबी मशिन्स आहेत. तथापी नारेगाव डंपिंग ग्राऊंड बंद झाल्यानंतर वार्ड कार्यालयामार्फत ओला कचरा कांचनवाडी, पडेगाव, हर्सुल, चिकलठाणा इत्यादी नियोजीत घनकचरा प्रक्रिया केंद्राच्या ठिकाणी पाठविण्यात येत असून, अनेकवेळा त्या परिसरातील नागरीकांच्या विरोधामुळे दररोज उत्पत्ती होणारा घनकचरा

नियोजीत प्रक्रिया स्थळावर घेवून जाणे शक्य होत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर घनकचरा शहरात साचून राहतो. सदरील जास्तीच्या घनकचरा उचलण्यासाठी खाजगी वाहने व जेसीबी मशिन्सची आवश्यकता पडते. या व्यतिरिक्त सुका कचरा चितेगांव येथे खाजगी कंपनीत प्रक्रियेसाठी पाठविण्यात येत असून, सुका कचऱ्याच्या वाहतुकीसाठी जास्तीचे अंतर कापावे लागत असल्यामुळे व वाहने अनलोड करण्यासाठी वेटींग करावे लागत असल्यामुळे मनपाची बहुतांशी वाहने सध्या सुका कचऱ्याच्या वाहतुकीसाठी कार्यरत आहेत. त्यामुळे ओला कचऱ्याच्या वाहतुकीसाठी खाजगी टिप्पर्स, हायवा, ट्रॅक्टर्सची व वाहनात घनकचरा भरण्यासाठी खाजगी जेसीबी मशिन्सची वेळोवेळी वार्ड कार्यालयाकडून मागणी होत आहे. नागरी आरोग्याच्या दृष्टीने शहरातील विविध प्रभागात साचलेला घनकचरा लवकरात लवकर उचलणे आवश्यक असल्यामुळे घनकचरा कक्षाच्या व वार्ड कार्यालयांच्या मागणी प्रमाणे तातडीने अतिरिक्त वाहने उपलब्ध करून द्यावी लागत आहेत.

घनकचरा व्यवस्थापनाच्या कामात सुसूत्रता आणण्यासाठी एकाच एजन्सी मार्फत घनकचरा संकलन व वाहतुकीचे काम करून घेण्यासाठी कार्यालयीन कार्यवाही करण्यात येत आहे. तथापी नवीन एजन्सीच्या नियुक्ती पर्यंत सदरील खाजगी वाहने आवश्यकतेनुसार किरायाने घ्यावी लागणार असून,त्यासाठी रू.१,१५,२७,३४४/- खर्च अपेक्षीत आहे. कामाची निकड लक्षात घेवून महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ नुसार अर्थसंकल्पातील इतर तरतूद कमी करून घनकचरा वाहतुकीसाठी वाहने किरायाने घेण्यासाठी आर्थिक तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

करीता घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी वाहने व मशिनरी किरायाने घेण्यासाठी रू.१,१५,२७,३४४/- आर्थिक तरतुद उपलब्ध करून देणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | : घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी वाहने व मशिनरी किरायाने घेण्यासाठी रु.१,१५,२७,३४४/- आर्थिक तरतुद उपलब्ध करुन देण्या बाबतचा हा विषय आहे. या मागची भुमिका काय आहे याचा खुलासा करण्यात यावा. |
| उपअभियंता | : जे वाहने घेणार आहोत ते कचरा वाहतुकीसाठी घेणार आहे. |
| श्री.गजानन बारवाल | : अनेक टिप्पर्स, ट्रॅक्टर, जेसीबी घेतले त्याचे कुठल्या प्रकारचे पेमेंट दिलेले आहे का? |
| यांत्रिकी अभियंता | : एकुण जो खर्च दाखवलेला आहे ते पेमेंट द्यावे लागणार आहे त्यासाठी प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. |
| श्री.गजानन बारवाल | : महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ नुसार अर्थसंकल्पातील इतर तरतुद कमी करुन म्हणजे काय? |
| मा.सभापती | : अर्थसंकल्पात इतर तरतुद कमी करुन. कशासाठी प्रस्ताव ठेवला आहे? प्रस्तावातुन हे शब्द वगळले पाहिजे. कशाला आर्थिक तरतुद द्यायची की नाही द्यायची हे सभागृह ठरवेल. |
| श्रीमती.सायरा बानो | : या प्रोजेक्टची मला चांगली ब्रेकिंग पाहिजे. हा प्रोजेक्ट ६० वर्षासाठी आहे. |
| श्री.गजानन बारवाल | : हा विषय मंजुर करायला हरकत नाही आणि बजेटमधुन कुठल्या प्रकारचे पैसे कमी होता कामा नये. |
| मा.सभापती | : विषय क्र.१०८ मंजुर करण्यात येतो. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात दररोज सरासरी ४५० मेट्रीक टन घनकचऱ्याची उत्पत्ती होत असल्याने, तसेच नारेगाव डंपिंग ग्राऊंड बंद झाल्यानंतर वार्ड कार्यालयामार्फत ओला कचरा कांचनवाडी, पडेगाव, हर्सुल, चिकलठाणा इत्यादी नियोजीत घनकचरा प्रक्रिया केंद्राच्या ठिकाणी पाठविण्याकरीता घनकचरा उचलण्यासाठी खाजगी वाहने व जेसीबी मशिन्सची आवश्यकता पडत असल्यामुळे तसेच या व्यतिरिक्त सुका कचरा चितेगांव येथे खाजगी कंपनीत प्रक्रियेसाठी पाठविण्यात येत असून, सुका कचऱ्याच्या वाहतुकीसाठी जास्तीचे अंतर कापावे लागत असल्यामुळे व वाहने अनलोड करण्यासाठी वेटींग करावे लागत असल्यामुळे मनपाची बहुतांशी वाहने सध्या सुका कचऱ्याच्या वाहतुकीसाठी कार्यरत आहेत. त्यामुळे ओला कचऱ्याच्या वाहतुकीसाठी खाजगी टिप्पर्स, हायवा, ट्रॅक्टर्सची व वाहनात घनकचरा भरण्यासाठी

खाजगी जेसीबी मशिन्सची वेळोवेळी वार्ड कार्यालयाकडून मागणी होत असल्याने, नागरी आरोग्याच्या दृष्टीने शहरातील विविध प्रभागात साचलेला घनकचरा लवकरात लवकर उचलणे आवश्यक असल्यामुळे घनकचरा कक्षाच्या व वार्ड कार्यालयांच्या मागणी प्रमाणे तातडीने अतिरिक्त वाहने उपलब्ध करून द्यावी लागत असल्याने, घनकचरा व्यवस्थापनाच्या कामात सुसूत्रता आणण्यासाठी एकाच एजन्सी मार्फत घनकचरा संकलन व वाहतुकीचे काम करून घेण्यासाठी तसेच नवीन एजन्सीच्या नियुक्ती पर्यंत सदरील खाजगी वाहने न्यु साधना इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून आवश्यकतेनुसार किरायाने घ्यावी लागणार असल्यामुळे, त्यासाठी लागणाऱ्या अपेक्षित रू.१,१५,२७,३४४/- च्या खर्चास व घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी वाहने व मशिनरी किरायाने घेण्यासाठी रू.१,१५,२७,३४४/- आर्थिक तरतुद उपलब्ध करून देणेसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०९ :</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मनपाचा शहाबाजार येथील शेळी, मेंढी व बकरा, लहान जनावरांचा कत्तलखाना फिस वसुलीचा ठेका प्रती जनावरे शेळी, मेंढी व बकरा रू.१५/- प्रमाणे देणे बाबत मार्च २०२० पर्यंतच्या कालावधीसाठी दि.०२/०७/२०१८ रोजीच्या मान्यतेन्वये ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेची आधारभुत रक्कम रू.२० लक्ष ठेवण्यात आली होती निविदेचा कालावधी दि.०१/०९/२०१८ ते ३१/०३/२०२० एकूण १९ महिने करीता निविदा मागविण्यात आल्या असता, पहिल्या ई-निविदेस फक्त दोन निविदा धारकांनी प्रतिसाद दिल्याने पून्हा फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. दुसऱ्या वेळच्या निविदेमध्ये ०३ निविदा प्राप्त झाल्याने दि.१०/०८/२०१८ रोजी सदर निविदा उघडण्यात आल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | आधारभुत रक्कम | अरहम एन्टरप्राईजेस | समीर जावेद कुरेशी यांचे दर | फारूख कुरेशी यांचे दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | शहाबाजार कत्तल फि वसुली ठेका दि.०१/०९/२०१८ ते ३१/०३/२०२० | रू.२० लक्ष | रू.२२,०६,०००/- | रू.२१,७७,३१३/- | रू.१२,५०,०००/- |

तुलनात्मकदृष्टीने कत्तल फिस वसुलीसाठी सर्वात जास्त दर मे.अरहम एन्टरप्राईजेस यांचे रू.२२,०६,०००/- (बावीस लक्ष सहा हजार) दर आहेत.

दि.२४/०८/२०१८ रोजी अतिरिक्त आयुक्त, मनपा यांच्या अध्यक्षतेखाली निविदा दराच्या वाटाघाटीसाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचे सदस्य-कर निर्धारक व संकलक, मुख्य लेखाधिकारी आणि मुख्य पशुसंवर्धन अधिकारी आहेत. या समितीने यशस्वी निविदा धारक मे.अरहम एन्टरप्राईजेस यांचेशी झालेल्या वाटाघाटी नंतर त्यांचे निविदा दर रू.२२,०६,०००/- यामध्ये वाढ करून रू.२२,२५,०००/- (बावीस लक्ष पंचवीस हजार) दि.०१/०९/२०१८ ते ३१/०३/२०२० पर्यंत एकूण १९ महिने या कालावधीकरीता भरण्यास होकार दर्शविला आहे. तरी मे.अरहम एन्टरप्राईजेस यांना रू.२२,२५,०००/- मध्ये वसुली ठेका देण्याबाबत प्रस्ताव मान्य तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र.१०९ व ११० मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाचा शहाबाजार येथील शेळी, मेंढी व बकरा, लहान जनावरांचा कत्तलखाना फिस वसुलीचा ठेक्यासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक मे.अरहम एन्टरप्राईजेस यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचे निविदा दर रू.२२,०६,०००/- यामध्ये वाढ करून रू.२२,२५,०००/- (बावीस लक्ष पंचवीस हजार) दि.०१/०९/२०१८ ते ३१/०३/२०२० पर्यंत एकूण १९ महिने या कालावधीकरीता भरण्यास होकार दर्शविला असल्याने, मे.अरहम एन्टरप्राईजेस यांना रू.२२,२५,०००/- मध्ये वसुली ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११० :**

विषय :- वार्ड क्र.०२ भगतसिंगनगर हर्सुल अंतर्गत विविध ठिकाणी जलनिःसारण वाहिनी टाकणे बाबत, या कामाचे ठेकेदार श्री.बी.वाय. ढाकणे यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.९९९७०३०.०७/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ :- टेंडर क्रमांक-2018-AMCA-308159-1

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | अभियंता झोन क्र.०६ |
| २ | कामाचे स्वरुप | जलनिःसारण वाहिनी टाकणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ९९९७०३०.०७ |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई महासेल निविदा सूचना दिनांक ०९/०४/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | --- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १४/०६/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०३ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.बी.वाय. ढाकणे | १०८९६७७२.७८ | ९.००% जास्त दराने |
| ०२. | मे.एस.एम.कन्स्ट्रक्शन कपंनी | १०९९६७३३.०८ | १०.००% जास्त दराने |
| ०३. | मे.पटेल कन्स्ट्रक्शन | ११०९६७०३.३८ | ११.००% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | द.व सु.यो. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.सर्वसाधारण सभा दि.१९/०३/२०१८ विषय क्र.३७३ |

तरी विषयांकिंत काम ठेकेदार श्री.बी.वाय.ढाकणे यांचेकडून ९.००% जास्त दराने निविदा भरली होती. तथापी सदरील काम संबंधीत मक्तेदार प्रस्तावित काम ९.००% जास्त दराने ऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास संमती दिली आहे.त्यास मा.अतिरिक्त आयुक्त महोदय यांची मंजुरी प्राप्त आहे. करीता म्हणजेच टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ सुत्रानुसार अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०२ भगतसिंगनगर हर्सुल अंतर्गत विविध ठिकाणी जलनिःसारण वाहिनी टाकणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.००%

जास्त दराचे निविदाधारक ठेकेदार श्री.बी.वाय. ढाकणे यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास संमती दिल्याने सदरील ठेकेदार श्री.बी.वाय. ढाकणे यांचेकडून ९.००% जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.९९९७०३०.०७/- पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १११ :**

विषय :- घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरात घरोघरी कचरा संकलन करणे व प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतूक करण्यासाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.२०१८-AMCA-३२५७३३-३ सन २०१८-१९

महोदय,

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
| २ | कामाचे स्वरुप | घनकचरा प्रक्रिया अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत ०७ वर्षासाठी शहरात घरोघरी कचरा संकलन करून प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतूक करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, एकत्रित डी.पी.आर. रक्कम रूपये ९१.७९५ कोटी, मान्यता दिनांक ०२/०४/२०१८ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | एजन्सीकडून देकार दर स्वरूपात |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | जिल्हा स्तरावरील वर्तमानपत्रे मराठी ०१, राज्यस्तरीय वर्तमानपत्रे मराठी ०२, हिंदी ०१ आणि राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रे इंग्रजी ०२, हिंदी ०१ तसेच ई-टेंडर विभाग |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०१. दि.१४/०६/२०१८ ते २४/०७/२०१८<br>०२. दि.३१/०७/२०१८ ते ०८/०८/२०१८<br>०३. दि.१०/०८/२०१८ ते २४/०८/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दिनांक २७/०८/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०३ (तीन) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | पी.गोपीनाथ रेड्डी | रूपये १,८७२/- प्रति टन | First Lowest |
| ०२. | स्वच्छता कार्पोरेशन | रूपये १,९७९/- प्रति टन | Second Lowest |
| ०३. | ऑपरचुन हॉस्पीटीलीटी सर्व्हीसेस | निरंक | तांत्रिकदृष्ट्या नाकारण्यात आले |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | लागु नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | मनपा फंड |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | --- |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | --- |

विषयांकित कामासाठी ठेकेदार पी.गोपीनाथ रेड्डी यांनी घनकचरा प्रक्रिया अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत ०७ वर्षासाठी शहरात घरोघरी कचरा संकलन करून प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतूक करणेसाठी रूपये १,८७२/- प्रति टन सर्वात कमी दर दाखल केलेले आहेत.

प्राप्त दराच्या अनुषंगाने पी.गोपीनाथ रेड्डी यांना दिनांक १०/०९/२०१८ रोजी वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले असता, वाटाघाटीअंती त्यांनी रूपये १,८७२/- प्रति टन ऐवजी रूपये १,८,६३/- प्रति टन दराने काम करण्यास लेखी सहमती दर्शविली आहे.

शहरातील कचरा संकलना बरोबर ७५ हातगाड्या ३०० ॲटो टिप्पर, ३० हायड्रॉलिक जॅक असणारे टिप्पर, ०९ कॉम्पॅक्टर्स तसेच गरजेप्रमाणे एक्स्वेटर व इतर मशिनरी आणि आवश्यक असलेल्या मनुष्यबळासह पुरवठा करण्याचा समावेश आहे.

तरी सदरील काम पी.गोपीनाथ रेड्डी, कंत्राटदार यांचेकडून वाटाघाटीअंती निश्चित झालेल्या रूपये १,८६३/- प्रति टन या दराने ०७ वर्षासाठी काम करून घेणेस आणि निविदा अटी शर्तीचे कलम-१.३.२ मधील क्रं.२३ मध्ये दर्शविल्यानुसार संबंधीत कंत्राटदाराचे काम समाधानकारक असल्यास कामाचा कालावधी संपल्यानंतर पूढील ०३ वर्षासाठी मुदतवाढ देण्याच्या मंजुरीस्तव व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

श्रीमती राखी देसरडा : विषय क्र.१११ घनकचरा व्यवस्थापण अंतर्गत शहरात घरोघरी कचरा संकलन करणे व प्रक्रीया करणे केंद्रापर्यत वाहतुक करण्यासाठी विषय आलेला आहे. यास सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली आहे. त्यावेळी प्रशासनाचे व सर्वसाधारण सभेचे काय मत होते व कोणत्या अटी त्यात होत्या याची कुठलीही माहिती यामध्ये देण्यात आली नाही. प्रशासनाने निवीदा काढतांना कोणत्या अटीं होत्या याचाही खुलासा यामध्ये केलेला नाही. ज्या अटी व शर्ती निवीदेला लागू होत्या त्या अटी शर्ती लागु असणाऱ्या किती कंपण्या भारतात असतील याचा प्रशासनाने अभ्यास केलाच असेल. ह्या अटी पुर्ण करणाऱ्या किती कंपण्या भारतात आहे. याचा खुलासा प्रशासनाने करावा. आज पर्यंत कचरा व्यवस्थापनाचे काम मनपा करत होते त्यात मनपाचे कर्मचारी/बचत गट या मार्फत व मनपाच्या यांत्रिकी विभागाकडुन मोठ्या प्रमाणावर आत्ताच खरेदी केलेल्या लोडींग रिक्षा, ट्रक, जेसीबी, हूक लोडर व इतर सामुग्री मनपाकडे आहे. ते कुठे उपयोगात आणणार आहे. राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जाहीरात देऊन सुध्दा म्हणावा तसा प्रतिसाद या निवीदेला मिळालेला दिसून येत नाही. त्यामुळे मनात शंका निमार्ण होते की नेमलेली पीएमसी ही निवीदा काढत असतांना ज्या अटी शर्ती त्या निवीदेत टाकतात, त्या एखादी कंपनी डोळ्यासमोर ठेऊन त्या अटी शर्ती टाकल्या जातात की काय ज्यामुळे संबंधीत शिवाय दुसरी कोणतीही कंपणी ह्या निवीदेच्या अटी व शर्ती पुर्णच करु शकत नाही व कोणतीही स्पर्धा न होता ठराविक कंपनीला काम मिळणे सोपे होईल अशा प्रकारच्या निवीदा मधील अटी शर्ती टाकण्यात येत आहे असे विषय क्र.१११ वरुण दिसुन येत आहे. याची चौकशी करण्याची गरज आहे. जो पर्यंत वरील सर्व खुलासे व माहिती आम्हा सर्व सदस्यांना द्यावी.

कक्ष प्रमुख(घनकचरा) : सभागृहामध्ये यावर जी चर्चा झाली होती की, व्हीकल ची संख्या किती असावी. सीएलडी काढले होते त्यामध्ये काही बदल केला होता. डीपीआर मध्ये ५५० टिप्पर ठेवणार होतो ते कमी करुन ३०० ठेवण्यात आले. चेंजेस करुन सीएलडी अपलोड करण्यात आले. भारतामध्ये बऱ्याचश्या कंपण्या कचरा व्यवस्थापन बाबत काम करत आहे. प्रीबीड मिटींग जेव्हा घेण्यात आली तेव्हा आठ कंपण्यांनी सहभाग नोंदवला. पहिला कॉल करण्यात आला तेव्हा एकच एजन्सी आली होती. तेव्हा ते नियमानुसार ओपन करता आले नाही. दुसरा कॉल जेव्हा करण्यात आला त्यामध्ये एकही एजन्सी आली नाही. नंतर तिसरा कॉल करण्यात आला तेव्हा तीन एजन्सी आले होते त्याची तांत्रिक तपासणी करण्यात आली. थड कॉल असल्या कारणाने ते फायन्सशियल ओपन केले. लेबर आणि व्हीकल चा जो विषय आहे १०८ मनपाच्या ॲटो रिक्षा आहेत आणि २३६ खाजगी ॲटो रिक्षा लावलेले आहेत. एकुण ३४४ ॲटो कलेक्शनचे काम करत आहेत आणि आताचा जो टेंडर आहे त्याच्यामध्ये एमएचडब्लु जे आहे त्याच्यानुसार ॲटो, टिप्पर असावेत. आस्थापनेवरील १२९५ सफाई मजुर शहरामध्ये काम करत आहेत. याच्यामध्ये बचत गटाचे ६८६ सफाई मजुर आहेत आणि एजन्सिकडुन २०० सफाई मजुर आहेत. हे जे ८५० लेबर काम करत आहेत या लेबरची सेवा खंडीत करावी लागेल. आस्थापनेवरचे जे लेबर आहेत ते नाल्या साफ करणे, कचरा शिफ्टींग करणे इत्यादी कामे करतात. त्यातले काही

सुपर व्हिजनचे काम करतात. मनपाकडे स्वतःचे १८, खाजगी वाहन १०८ टिप्पर आणि ३७ छोटे मोठे वाहन आहेत त्या व्यतिरिक्त जे प्राव्हेट व्हीकल आहे ते बंद करावे लागतील.

श्री.गजानन बारवाल : जो पैसा खर्च करणार तो शासनाकडुन आलेल्या निधीतुन करणार आहोत का?

कक्ष प्रमुख(घनकचरा) : जो खर्च करणार तो मनपा फंडातुन करणार आहे.

श्री.गजानन बारवाल : मनपा फंडातुन किती पैसे खर्च करणार आहोत?

कक्ष प्रमुख(घनकचरा) : शहरात दररोज ४५० मेट्रिक टन कचरा जमा होतो त्याचा विचार केला असता टिपींग चार्जेस २ कोटी ५१ लाख रुपये महिन्याला असे वर्षाला ३० कोटी १८ लाख रुपये द्यावे लागतील.

श्री.गजानन बारवाल : रुपये ३० कोटी ५९ लाख ९७ हजार ७५० रुपये त्याची व्यवस्था काय?

कक्ष प्रमुख(घनकचरा) : पुर्वी जे बचत गटाचे पेमेंट किंवा एजन्सिला जे पेमेंट करायचो आणि जे प्रायव्हेट कामगारांना जो पगार करतो तो मनपा फंडातुनच करतो. त्याचे वार्षिक बजेट २५ कोटी पर्यंत आहे. त्यालाच रिप्लेस करणार आहे आणि मनपा फंडातुन हा पैसा खर्च होणार आहे.

मा.सभापती : अतिरिक्त बोजा महापालिकेवर पडणार की नाही?

कक्ष प्रमुख(घनकचरा) : पुर्वी जो खर्च व्हायचा त्यातुनच खर्च होईल.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : वृत्तपत्रातुन वाचले की, निवासी मिळकतीसाठी दररोजचा १ रु. व कमर्शियल मिळकतीसाठी १० रुपये उपभोक्ता कर वसुल करणार आहोत ही बातमी खरी आहे का?

कक्ष प्रमुख(घनकचरा) : एमएचडब्लु नियम जे आहे त्यानुसार उपभोक्ता कर मिळकत धारकाकडुन वसुल करावे असे निर्देश आहे. असा ठराव सर्वसाधारण सभेमध्ये घेतला आहे की, कंपनीचे काम सुरु होताच रेसिडेन्सीयल मालमत्ता धारकाकडुन एक रुपये दररोज असा ३० रुपये महिना आणि व्यावसायिक मिळकत धारकाकडुन दोन रुपये दररोज असा ६० रूपये महिना असा कर द्यावा लागणार आहे.

श्री.गजानन बारवाल : यामध्ये योग्य प्रकारे दखल घ्यावी आणि मनपावर अतिरिक्त बोजा पडणार नाही याची दक्षता घेऊन हा विषय मंजुर करावा.

श्रीमती.सायरा बानो : कचरासाठी शेडचे काम, कचरा प्रोसेसिंगचे काम, सुरु झाल्यास किती खर्च येईल याचा खुलासा करावा.

कक्ष प्रमुख(घनकचरा) : प्रोसेसिंगचे दोन पध्दतीचे काम आहे सेंट्रलाईज प्रोसेसिंग आणि डीसेंट्रलाईज प्रोसेसिंग. डीसेंट्रलाईजमध्ये नऊ ठिकाणी मशिन बसवणार आहोत त्यात तीन ठिकाणी वर्कऑर्डर देण्यात आली आहे चिकलठाणा, हर्सुल आणि पडेगाव, यामध्ये चिकलठाण्याचे काम सुरु झाले आहे.

श्रीमती.सायरा बानो : महिन्याचा दिड कोटीचा खर्च आहे तो कुठून केला जाणार आहे.

कक्ष प्रमुख (घनकचरा) : मनपा फंडमधुन केला जाईल.

मा.सभापती : प्रशासनाने केलेल्या खुलाशावर सर्व स.सदस्यांचे समाधान झाले आहे का. अजूनही काही शंका असल्यास विचारा. विषय मंजूर करायचा आहे का.

(यावेळी उपस्थित सर्वच स.सदस्य नाही, नाही म्हणुन प्रस्ताव मंजुर करण्याची मागणी करतात.)

मा.सभापती : विषय क्र.१११ ला मंजुरी देत असतांना सर्व सदस्यांची मागणी आहे की, दर वर्षी कचरा संकलन व प्रोसेस साठी होणारा खर्चाचा कार्य अहवाल स्थायी समितीमध्ये आला पाहिजे, विषय मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरात घरोघरी कचरा संकलन करणे व प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतूक करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक पी.गोपीनाथ रेड्डी, कंत्राटदार यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचेकडून वाटाघाटीअंती निश्चित झालेल्या रूपये १,८६३/- प्रति टन या दराने ०७ वर्षासाठी काम करून घेणेस आणि निविदा अटी शर्तीचे कलम-१.३.२ मधील क्रं.२३ मध्ये दर्शविल्यानुसार संबंधीत कंत्राटदाराचे काम समाधानकारक असल्यास कामाचा कालावधी संपल्यानंतर पूढील ०३ वर्षासाठी मुदतवाढ देण्यास व करार करणेस तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दरवर्षी कचरा संकलन व प्रोसेससाठी होणारा खर्चाचा कार्य अहवाल स्थायी समितीसमोर ठेवावा यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०३ एकतानगर अंतर्गत धनगर समाज स्मशानभुमीमध्ये विविध विकास कामे करणे बाबत, या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३४,९९,२००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची २०१७-१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित २०१८-१९ मधील स्मशानभुमी विकास या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३४,९९,२००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.गजानन बारवाल : मागच्या वर्षीप्रमाणे जेवढा खर्च होता तेवढाच खर्च दिला आहे. त्याचा योग्य प्रकारे वापर व्हायला पाहिजे. शहरातील जेवढे स्मशान भुमि आहे तेवढ्या चांगल्या होण्याच्या दृष्टिकोनातुन अंदाजपत्रक केले पाहिजे.

मा.सभापती : स.सदस्यांची जी सुचना मांडली त्याची प्रशासनाने नोंद घ्यावी, विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०३ एकतानगर अंतर्गत धनगर समाज स्मशानभुमीमध्ये विविध विकास कामे करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३४,९९,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या एकूण १३२ बालवाडी शिक्षिका व १३ बालवाडी सेविका यांना सद्यस्थितीत दरमाह अनुक्रमे रू.५०००/- व रू.३०००/- इतके मानधन देण्यात येते. सदर मानधन खुप कमी असून त्यात वाढ करण्यात यावी, यासाठी संबंधीत कर्मचारी सातत्याने मानधन वाढ करणे बाबत मागणी करीत आहेत.

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.३०२ दिनांक ०९/०२/२०१८ नुसार बालवाडी शिक्षिका व बालवाडी सेविका यांना अनुक्रमे दरमाह रू.१०,०००/- व रू.५,०००/- इतकी मानधन वाढ करण्यास मान्यता मिळाली आहे.

करीता सन २०१८-१९ च्या द्वितीय सत्रापासून (दिवाळीच्या सुट्ट्यानंतर) बालवाडी शिक्षिका यांना रू.१०,०००/-व बालवाडी सेविका यांना रू.५,०००/-इतकी मानधन वाढ करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

श्री.गजानन बारवाल : या प्रस्तावानुसार वाढीव शिक्षकांना इतर शाळेत वर्ग करण्यास हरकत नाही. दिवाळी सनापर्यंत मानधनामध्ये वाढ करणे गरजेचे आहे याची दखल घ्यावी आणि प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्रीमती.राखी देसरडा : विषय क्र.११३ व विषय क्र.११४ हे विषय बालवाडी शिक्षक व बालवाडी सेविका व तासीका तत्वावरील शिक्षक यांचा पगारवाडी संदर्भात आहे. सध्या स्थितीच्या कर्मचाऱ्यांना असलेला पगार हा कमी आहे त्यात वाढ होणे गरजेचे आहे. महानगर पालिकेच्या एकुण शाळा व त्या प्रत्येक शाळेत असणारी विद्यार्थ्यांची संख्या याचा विचार केला तर असे आढळुण आले आहे की, काही शाळेत विद्यार्थ्यांची संख्या अत्यंत कमी आहे. शाळेमध्ये पाहिजे तेवढे काम संबंधीत शिक्षकांना नाही. या सर्व गोष्टीचा विचार केला असता शाळेच्या जवळ असणाऱ्या मनपाच्या शाळेत वर्ग करता येतील का? याचा विचार आजपर्यंत प्रशासनाने केला नाही ही फार खेदजनक बाब आहे. मनपाची आर्थिक परिस्थितीचा विचार केला असता असे काही कठोर निर्णय घेण्यासाठी प्रशासनाने पुढे यायला हवे. पण तसे प्रशासनाकडुन होतांना दिसत नाही. उलट लोकप्रतिनिधीच असे मुद्दे मांडतात. प्रशासनाला पुढच्या मिटींगमध्ये शाळा व शाळेतील विद्यार्थी, शिक्षक याचा पूर्ण अहवाल सादर करुन अशा काही शाळा जवळच्या शाळेमध्ये मर्च करता येईल का असा अहवाल त्यांनी स्थायी समिती समोर सादर करावा. असे आदेश प्रशासनाला देण्यात यावे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : उस्मानपुऱ्याच्या शाळेमध्ये फक्त २० विद्यार्थी आणि पाच शिक्षक आहे. अशा शिक्षकांना इतर शाळेत वर्ग करता आले तर वाढीव खर्च कमी होईल. हा विषय स्थगित करुन सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यात यावा.

मा.सभापती : विषय क्र.११३-११४ मध्ये मा.आयुक्तांचा आग्रह होता की, हा विषय मंजुर केला पाहिजे. खुप कमी मानधनावर शिक्षक काम करत आहे. यामध्ये वाढ झाली पाहिजे. परंतु सदस्यांनी मुद्दे मांडले ते अतिशय रास्त आहे. विषय क्र.११३-११४ मध्ये धोरण निश्चित करण्यासाठी हे दोन्ही विषय सर्वसाधारण सभेकडे वर्ग करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार विषय क्र.११३ मध्ये शिक्षक खुप कमी मानधनावर काम करत आहे, यामध्ये वाढ झाली पाहिजे. परंतु सदस्यांनी मुद्दे मांडले ते अतिशय रास्त आहे. विषय क्र.११३-११४ मध्ये धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्यामुळे, हे दोन्ही विषय सर्वसाधारण सभेकडे वर्ग करण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले. सदर ठराव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यांत येते.

**विषय क्र. ११४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या एकूण ४३ घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक यांना सद्यस्थितीत प्रति तास रू.९०/- इतके मानधन देण्यात येते. सदर मानधन खुप तुटपुंजे असून त्यात वाढ करण्यात यावी यासाठी संबंधीत कर्मचारी सातत्याने मानधन वाढ करणे बाबत मागणी करीत आहेत.

सद्यस्थितीत रू.९०/- प्रमाणे दररोज साधारण ४ तासिका याप्रमाणे ४३ घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांवर दरमाह होणारा खर्च साधारणतः ९०x४x४३ x२४ = ३,७१,५२०/- इतका आहे. वार्षिक खर्च साधारणतः ३,७१,५२० x १० =३७,१५,२००/- इतका आहे.

रू.१८०/- प्रमाणे दररोज साधारण ४ तासिका याप्रमाणे ४३ घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांवर दरमाह होणारा खर्च साधारणतः १८०x४ x४३ x२४ = ७,४३,०४०/- इतका असेल. वार्षिक खर्च साधारणतः ७,४३,०४०/- x १० =७४,३०,४००/- इतका असेल.

सन २०१८-१९ च्या मुळ अर्थसंकल्पात शिक्षण विभाग वेतनाकरीता रू.४०,४१,६०,०००/- (अक्षरी रूपये चाळीस कोटी एक्केचाळीस लाख साठ हजार) इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. आवश्यकता भासल्यास सुधारीत अर्थसंकल्पात वाढीव तरतुद करावी लागेल.

करीता सन २०१८-१९ च्या द्वितीय सत्रापासून (दिवाळीच्या सुट्ट्यानंतर) घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक यांना प्रति तास रू.१८०/- इतकी मानधन वाढ करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

श्री.गजानन बारवाल : या प्रस्तावानुसार वाढीव शिक्षकांना इतर शाळेत वर्ग करण्यास हरकत नाही. दिवाळी सनापर्यंत मानधनामध्ये वाढ करणे गरजेचे आहे याची दखल घ्यावी आणि प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्रीमती.राखी देसरडा : विषय क्र.११३ व विषय क्र.११४ हे विषय बालवाडी शिक्षक व बालवाडी सेविका व तासीका तत्वावरील शिक्षक यांचा पगारवाडी संदर्भात आहे. सध्या स्थितीच्या कर्मचाऱ्यांना असलेला पगार हा कमी आहे त्यात वाढ होणे गरजेचे आहे. महानगर पालिकेच्या एकुण शाळा व त्या प्रत्येक शाळेत असणारी विद्यार्थ्यांची संख्या याचा विचार केला तर असे आढळुण आले आहे की, काही शाळेत विद्यार्थ्यांची संख्या अत्यंत कमी आहे. शाळेमध्ये पाहिजे तेवढे काम संबंधीत शिक्षकांना नाही. या सर्व गोष्टीचा विचार केला असता शाळेच्या जवळ असणाऱ्या मनपाच्या शाळेत वर्ग करता येतील का? याचा विचार आजपर्यंत प्रशासनाने केला नाही ही फार खेदजनक बाब आहे. मनपाची आर्थिक परिस्थितीचा विचार केला असता असे काही कठोर निर्णय घेण्यासाठी प्रशासनाने पुढे यायला हवे. पण तसे प्रशासनाकडुन होतांना दिसत नाही. उलट लोकप्रतिनिधीच असे मुद्दे मांडतात. प्रशासनाला पुढच्या मिटींगमध्ये शाळा व शाळेतील विद्यार्थी, शिक्षक याचा पूर्ण

अहवाल सादर करुन अशा काही शाळा जवळच्या शाळेमध्ये मर्च करता येईल का असा अहवाल त्यांनी स्थायी समिती समोर सादर करावा. असे आदेश प्रशासनाला देण्यात यावे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : उस्मानपुऱ्याच्या शाळेमध्ये फक्त २० विद्यार्थी आणि पाच शिक्षक आहे. अशा शिक्षकांना इतर शाळेत वर्ग करता आले तर वाढीव खर्च कमी होईल. हा विषय स्थगित करुन सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यात यावा.

मा.सभापती : विषय क्र.११३-११४ मध्ये मा.आयुक्तांचा आग्रह होता की, हा विषय मंजुर केला पाहिजे. खुप कमी मानधनावर शिक्षक काम करत आहे. यामध्ये वाढ झाली पाहिजे. परंतु सदस्यांनी मुद्दे मांडले ते अतिशय रास्त आहे. विषय क्र.११३-११४ मध्ये धोरण निश्चित करण्यासाठी हे दोन्ही विषय सर्वसाधारण सभेकडे वर्ग करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार विषय क्र.११४ मध्ये शिक्षक खुप कमी मानधनावर काम करत आहे, यामध्ये वाढ झाली पाहिजे. परंतु सदस्यांनी मुद्दे मांडले ते अतिशय रास्त आहे. विषय क्र.११३-११४ मध्ये धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्यामुळे, हे दोन्ही विषय सर्वसाधारण सभेकडे वर्ग करण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले. सदर ठराव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यांत येते.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ११५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७९ न्यायनगर, अंतर्गत पहाडे कॉर्नर ते पुंडलिकनगर ग.क्र.०२ पर्यंत मंजुर असलेल्या आदर्श रस्त्याच्या उर्वरीत भागाचे कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक एस.एस.आर.-२०१७-१८ नुसार र.रू.४९,९७,५६२/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षक मधुन प्रस्तावित करण्यात आला आहे.

करीता अंदाजपत्रक र.रू.४९,९७,५६२/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : ऐनवेळचा विषय क्र.११५ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७९ न्यायनगर, अंतर्गत पहाडे कॉर्नर ते पुंडलिकनगर ग.क्र.०२ पर्यंत मंजुर असलेल्या आदर्श रस्त्याच्या उर्वरीत भागाचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.४९,९७,५६२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद